॥ कां रे दुरावा? कां रे अबोला? ॥

गायिकाः आशा भोसले
गीतः ग. दि. माडगूळकर
संगीतः सुधीर फडके
चित्रपटः मुम्बईचा जावई

कां रे दुरावा? कां रे अबोला?
अपराध माझा असा काय झाला? ॥ धृ. ॥

नीज येत नाहीं मला एकटीला
कुणी न विचारी धरी हनुवटीला।
मान वळविशी तूं वेगळ्या दिशेला
अपराध माझा असा काय झाला? ॥ १ ॥

तुझ्यावाचुनी ही रात जात नाहीं
जवळी जरा ये हळू बोल कांही।
हात चांदण्यांचा घेई उशाला
अपराध माझा असा काय झाला? ॥ २ ॥

रात जागवावी असे आज वाटे
तृप्त झोप यावी पहाटे पहाटे।
नको जागणे हें नको स्वप्न माला
अपराध माझा असा काय झाला? ॥ ३ ॥